SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.
Affiliation No. 1130703
Academic session 2024-25
NOTES- 7(TERM-2)
Subject: MARATHI

Grade – 6th

Prepared by: Sandeep Bhosale

LESSON-7.झोपेत चालणारा मुलगा

---

प्रश्न १) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) परागला कोणती सवय होती?

उत्तर – परागला झोपेत चालण्याची सवय होती.

२) बाबांनी गच्चीला कुलूप का लावले?

उत्तर – पराग अंधारात कुठे पडला तर, जिना चढताना पायरी वरून चुकून कोसळला तर, झोपेत त्याला काही दुखापत झाली तर असे बाबांना वाटत होते म्हणून त्यांनी गच्चीला कुलूप लावले.

३) परागच्या काकांनी त्याची सवय घालवण्यासाठी काय करायचे ठरविले?

उत्तर – परागचे काका परागला दिल्लीला घेवून जाणार होते. दिल्लीला परागच्या काकांच्या ओळखीचे डॉक्टर एक आहेत. त्या डॉक्टरांकडे पराग दाखवणार होते. व त्याची झोपेत चालण्याची सवय मोडून काढणार होते.

४) कामवाल्या मावशीने कोणता उपाय सुचवला?

उत्तर – रात्री झोप लागली की परागचे पाय खाटेला बांधून ठेवायचे. एक दोरी घायची. एक टोक खाटेला बांधून ठेवायचे. रात्री हा झोपला कि दुसर टोक पायाला बांधून ठेवायचे. सवय सुटेपर्यंत हे असे केले कि दहा-बारा-पंधरा दिवसांनी आपोआप सवय सुटेल असा कामवाल्या मावशीने उपाय सुचविला.

प्रश्न २) कोण कोणास म्हणाले.

१) “असे रे काय करतोस? काळोखातून सरळ उठून चालायला लागतोस!”

उत्तर – परागची आई परागला म्हणाली.

२) “भीती कशी वाटणार? मला काही कळतच नाही तर”.

उत्तर – पराग आईला म्हणाला

३) “परागला मी दिल्लीला घेवून जातो.”

उत्तर – परागचे काका परागच्या आई –बाबांना म्हणाले.

४) “अहो ,औषध कसले? रात्री झोप लागली की पाय बांधून ठेवायचे खाटेला.”

उत्तर – कामवाल्या मावशी परागच्या आईला म्हणाल्या.

प्रश्न ३) कोण ते लिहा.

१) झोपेत चालणारा - पराग

२) गच्चीच्या दाराला कुलूप लावणारे – परागचे बाबा

३) परागला दिल्लीला घेऊन जाणारे - परागचे काका

४) युक्ती सांगणाऱ्या – कामवाल्या मावशी

प्रश्न ४) समानार्थी शब्द लिहा.

१) आश्चर्य - नवल २) काळोख – अंधार ३) ठिकाण – जागा

प्रश्न ५) विरुद्धार्थी शब्द लिहा.

१) अंधार x उजेड २) खुश x नाखूश ३) रात्र x दिवस

४) प्रश्न x उत्तर ५) सरळ x उलट

प्रश्न ६) पुढील शब्दांचे लिंग ओळखा.

१) गमंत – स्त्रीलिंग २) आई - स्त्रीलिंग ३) बाबा – पुल्लिंग

४) पराग – पुल्लिंग ५) काका – पुल्लिंग ६) मावशी - स्त्रीलिंग

प्रश्न ७) पुढील वाक्याचे काळ ओळखा व लिहा.

१) परागला झोपेतून उठून चालायची सवय होती.

उत्तर – भूतकाळ

२) मला ते औषध देतील.

उत्तर – भविष्यकाळ

३) बिनपैशाचे औषध आहे आपल्याकडे.

उत्तर – वर्तमानकाळ

४) परागची मात्र जाम निराशा झाली होती.

उत्तर – भूतकाळ

| SUBJECT TEACHER | HOD | CO-ORDINATOR | PRINCIPAL |
|---|---|---|---|
| [ ] | [ ] | [ ] | [ ] |